मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# महानगरपालिका कडून नागरिकांसाठी दिलासादायक निर्णय

## रेल्वेमार्गाखाली भुयारी मार्ग, ड्रेनेज सुधारणा, रुग्णालयातील आधुनिक यंत्रसामग्री आणि उद्यान विकासाला हिरवा कंदील

**पिंपरी | प्रतिनिधी**

फुगेवाडी येथे हिंदू स्मशानभूमी व मुस्लिम दफनभूमीकडे जाण्यासाठी रेल्वेमार्ग आणि 30 मीटर एचसीएमटीआर खाली भुयारी मार्ग उभारण्यात येणार आहे. त्यासाठी 4 कोटी 42 लाख खर्चासह शहरात आवश्यक ठिकाणी व्हॉल्व बसविणे. नवीन जलवाहिनी तसेच, ड्रेनेजलाईन टाकणे, रुग्णालयात नवीन यंत्रसामुग्री घेणे अशा विविध कामांच्या खर्चाना स्थायी समितीने मान्यता दिली आहे.



स्थायी समितीच्या बुधवारी (दि. 6) झालेल्या सभेच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते. या वेळी स्थायी समिती सदस्यांसह आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगर सचिव मुकेश कोळप आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

फुगेवाडी येथील हिंदू स्मशानभूमी आणि मुस्लिम दफनभूमीकडे जाण्यासाठी रेल्वे मार्ग ओलांडावा लागतो. त्यात अपघात होऊन अनेकांचा बळी गेला आहे. हे टाळण्यासाठी रेल्वेमार्गाच्या खाली भुयारी मार्ग बांधण्यात येत आहे. त्या कामाचे आदेश चैतन्य कन्स्ट्रक्शनला 11 डिसेंबर 2025 ला देण्यात आले आहेत. रेल्वेच्या मालकीच्या जागेतील कामाच्या नकाशाला रेल्वे खात्याने 10 मार्च 2026 ला मान्यता दिली आहे.

प्रस्तावित पुलाच्या कामाची पडताळणी रेल्वे विभागाकडून करण्यात येणार आहे. प्रत्यक्ष काम करतेवेळी व्यवस्थापन व समन्वय ठेवला जाणार आहे. तसेच, दहा वर्षे भुयारी मार्गाची देखभाल व दुरूस्ती रेल्वे खाते करणार आहे. त्यासाठी 3 कोटी 42 लाख रुपयांची मागणी रेल्वेने केली आहे. त्या खर्चास समितीने मान्यता दिली आहे.

सांगवी, पिंपळे निलख, पिंपळे गुरव परिसरातील ड्रेनेजलाईन टाकणे. अ, ब, क आणि फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ड्रेनेजलाईनची यांत्रिकी पद्धतीने दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे, ग आणि ड क्षेत्रीय कार्यालयांतील आदर्शनगर, मिलिंदनगर, शास्त्रीनगर, सुभाषनगर, कैलासनगर, गांधीनगर, इंदिरानगर, बलदेवनगर, संजय गांधीनगर, तापकीरनगर, अण्णा भाऊ साठेनगर, काळाखडक, म्हातोबानगर आदी झोपडपट्टी भागांमध्ये ड्रेनेजलाईन व्यवस्था सुधारणे आदी कामांना मान्यता देण्यात आली.

### उद्यानाचा विकास करण्यास मान्यता

» यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी अत्याधुनिक अल्ट्रा हाय डेफिनेशन कॅमेरा सिस्टम (अॅडव्हान्स लॅप्रोस्कोपीसाठी) खरेदी करणे, आकुर्डी येथील नवीन रुग्णालयातील वातानुकूलन यंत्रणेची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, नवीन तालेरा रुग्णालयातील दरवाजे व खिडक्यांसाठी पडदे बसविणे आणि लिफ्टची तीन वर्षांसाठी देखभाल करणे, शाहूनगर, संभाजीनगर, आकुर्डी, संत तुकारामनगर आणि केशवनगर-चिंचवड येथील मानधनावरील सार्वजनिक ग्रंथालयांना मुदतवाढ देणे, विविध प्रभागांतील उद्याने, शाळा, दुभाजक, आयलंड व मोकळ्या जागांमध्ये तैवान लॉन, ग्रीन लॉन, अमेरिका ब्लू लॉन, पास्को लॉन यांचा पुरवठा व विकास करण्यास आदी कामांना समितीने मान्यता दिली आहे.

# नाशिक फाटा-खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरसाठी प्रशासनाला सूचना

## शेतकरी व नागरिकांच्या हिताला प्राधान्य देणार : आमदार महेश लांडगे

**पिंपरी | प्रतिनिधी**

नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्प हा पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार ठरणार असून, विकासकामांसोबतच शेतकरी व नागरिकांच्या हितालाही प्राधान्य द्यावे, अशा सूचना भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.



या प्रकल्पासंदर्भात महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत नगर रचना विभाग आणि भू संपादन विभागाची संयुक्त बैठक घेण्यात आली. बैठकीत रॅम्प नियोजन, भूसंपादन प्रक्रिया आणि नागरिकांच्या अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

आमदार लांडगे यांनी प्रशासनाला स्पष्ट सूचना देताना भोसरी, मोशी आणि बोऱ्हाडेवाडी येथे रॅम्पसाठी शेतकऱ्यांची नव्याने जमीन संपादित न करता प्राधिकरणाच्या उपलब्ध जागेचा वापर करावा, असे सांगितले. तसेच इंद्रायणी नदी परिसरातील रॅम्प हा सोसायटीलगत न करता नदीपलीकडे नियोजित करण्याचे निर्देश दिले.

ई प्रभाग कार्यालयाजवळील दोन्ही रॅम्प साईनाथ हॉस्पिटल परिसरात एका बाजूस करण्यात यावेत, जेणेकरून नागरिकांना चौक ओलांडण्याची गरज भासणार नाही आणि वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होईल, अशी सूचना त्यांनी केली. प्रदर्शन केंद्राजवळ स्वतंत्र रॅम्प उतरवण्याचाही निर्णय बैठकीत घेण्यात आला.

भूसंपादन प्रक्रियेदरम्यान सुनावणीसाठी येणाऱ्या प्रत्येक नागरिकांचे समाधान होईल, याची प्रशासनाने विशेष काळजी घ्यावी, असे निर्देशही आमदार लांडगे यांनी दिले. भोसरी गावठाणातील ४५ मीटर गावठाण हद्द वगळून ६१ मीटर रुंदीकरणाचे रेखांकन नागरिकांना स्पष्टपणे समजावून सांगण्याच्या सूचनाही प्रशासनाला देण्यात आल्या.

संपूर्ण भूसंपादन प्रक्रिया गतीने आणि पारदर्शकपणे पूर्ण करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. या प्रकल्पामुळे भविष्यातील वाहतूक कोंडी कमी होऊन परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

> “नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर हा केवळ विकासाचा प्रकल्प नाही, तर पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेचा मजबूत पाया आहे. हा प्रकल्प राबवताना शेतकरी, स्थानिक नागरिक आणि परिसराच्या हिताला कुठेही धक्का लागणार नाही, याची आम्ही पूर्ण काळजी घेत आहोत. भूसंपादन प्रक्रियेत प्रत्येक नागरिकाला न्याय मिळेल, पारदर्शकता राखली जाईल आणि विकासासोबत लोकांचा विश्वासही अबाधित ठेवला जावा, अशी सूचना प्रशासनाला केली आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# सांडपाणी नदीत सोडणाऱ्या पीएमआरडीए हद्दीतील सोसायट्यांवर गुन्हे दाखल करा

## खासदार श्रीरंग बारणे यांची प्रशासनाला सूचना, मावळ लोकसभा मतदारसंघातील विकास कामांचा आढावा घेतला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) कडून पवना आणि इंद्रायणी नदीपात्रात लगत परवानगी दिलेल्या सोसायट्यांची पाहणी करावी. एसटीपी चालू आहेत की नाही हे तपासावे. थेट नदीत सांडपाणी सोडणाऱ्या सोसायट्यांवर गुन्हे दाखल करावेत. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळालाही कळविण्यात यावे. पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा इशारा खासदार श्रीरंग बारणे यांनी दिला.



पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील मावळ लोकसभा मतदारसंघातील विकास कामांचा खासदार बारणे यांनी गुरुवारी आढावा घेतला. आयुक्त अभिजीत चौधरी अतिरिक्त आयुक्त के. मंजूलक्ष्मी, पोलीस दक्षता अधिकारी अमोल झेंडे, वित्तीय नियंत्रक जितेंद्र कोलंबे, सह आयुक्त रुपाली आवले डंबे, सह आयुक्त पुनम मेहता, हिम्मत खराडे, मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे, मुख्य अभियंता अभियांत्रिकी विभाग शिवप्रसाद बागडी, रिनाज पठाण, उपसंचालक स्मिता कलकुटकी, संचालक विकास परवानगी विभाग अविनाश पाटील तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, मावळ तालुक्यात किल्ले आहेत. त्यामुळे पर्यटकांची संख्या जास्त असते. त्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाव्यात. लोहगडवरून विसापूरकडे जाणारा रस्ता विकसित करावा. लोहगड पायथ्याशी शिवसृष्टी उभारण्यात यावी. भाजे लेणीपासून लोहगडकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला सुरक्षा कठडे लावावेत. कारला फाटा ते मळवली हा रस्ता मंजूर असून त्याचे काम तत्काळ सुरू करावे. देहू ते येलवाडी या तळेगावला जोडणाऱ्या रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. वाहने जाणे कठीण झाले आहे. देहू, भंडारा डोंगर येथे येणाऱ्या वारकऱ्यांची संख्या जास्त असते. या रस्त्याची तत्काळ दुरुस्ती करावी.

तत्कालीन नवनगर विकास प्राधिकरणासाठी जागा दिलेल्या शेतकऱ्यांना शासन निर्णयानुसार तत्काळ परतावा द्यावा. कागदपत्रांमध्ये त्रुटी काढून शेतकऱ्यांना हेलपाटे मारायला लावले जाते. शेतकऱ्यांना तत्काळ सव्वा सहा टक्के परतावा देण्याची सूचना खासदार बारणे यांनी दिल्या.

### लक्ष्मी चौकातील कोंडी फोडा..

» भूमकर चौकातून लक्ष्मी रस्त्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. लक्ष्मी चौक – मारुंजी रोड परिसरात अनधिकृत विक्रेत्यांमुळे प्रचंड मोठी वाहतूक कोंडी निर्माण होते. हिंजवडी, वाकडकडून येणाऱ्या वाहनांमुळे लक्ष्मी चौकातील कोंडीत मोठी भर पडते. येथे अतिक्रमणे झाली आहेत. त्यावर कारवाई करून चौक कोंडीमुक्त करावा, अशी सूचना खासदार बारणे यांनी केली.

### पवना नदीवरील पुलाचे काम पूर्ण करा..

» पवना नदीच्या उगमापासून पिंपरी-चिंचवडपर्यंत नदी काठच्या गावाचे सर्वेक्षण करावे. नदी काठच्या गावात एसटीपी उभारावेत. नदी स्वच्छ ठेवण्यासाठी पीएमआरडीएने पुढाकार घ्यावा. किवळे ते सांगवडे दरम्यान पवना नदीवर महापालिका आणि पीएमआरडीएच्या वतीने पूल उभारण्यात येत आहे. महापालिका क्षेत्रातील काम झाले आहे. सांगवडे हद्दीत जागा ताब्यात नाही. त्यामुळे काम रखडले आहे. जागा ताब्यात घेऊन काम मार्गी लावावे, अशी सूचना खासदार बारणे यांनी केली.

# रक्षक चौक उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात..!

## औंध ते किवळे प्रवास होणार सिग्नलमुक्त : स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे निलख येथील रक्षक चौकात सुरू असलेल्या उड्डाणपुलाचे काम आता पूर्णत्वाच्या टप्प्यावर आले असून, या पुलामुळे औंध ते सांगवी फाटा आणि रावेतपासून पुढे किवळेपर्यंतचा प्रवास लवकरच सिग्नलमुक्त आणि वाहतूककोंडीमुक्त होणार आहे. चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाची नुकतीच पाहणी करून सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. या संदर्भात प्रकल्पाची सविस्तर माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी दिली. या महत्त्वपूर्ण प्रकल्पाबाबत आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळे गुरव येथील जनसंपर्क कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांची बैठकही पार पडली.



या प्रकल्पाच्या पाहणीवेळी नगरसेविका आरती चौंधे, नगरसेविका स्नेहा कलाटे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सामाजिक कार्यकर्ते संकेत चोंधे, प्रसाद कस्पटे, सनी बारणे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. रक्षक चौक हा शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत कळीचा टप्पा मानला जातो. आमदार शंकर जगताप यांच्या सूचनेनुसार, या ठिकाणी पुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी आणि पुढील नियोजनासाठी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यामध्ये पुलाच्या कामासह संलग्न असलेल्या बीआरटी बस वाहतुकीचे नियोजन कसे असेल, यावर विशेष भर देण्यात आला. बस प्रवासी आणि त्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश यावेळी प्रशासनाला देण्यात आले आहेत. तसेच पुलाचे रेलिंग आणि संपूर्ण कामाचे तातडीने 'सेफ्टी ऑडिट' करण्याच्या सूचनाही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. या उड्डाणपुलामुळे नागरिकांच्या वेळेची आणि इंधनाची मोठी बचत होणार असून, सांगवी-किवळे या संपूर्ण बीआरटी मार्गावरील वाहतूक अधिक वेगवान होणार आहे.

> आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाचा आढावा घेतला असून, हा पूल लवकरात लवकर नागरिकांच्या सेवेसाठी खुला करण्याचे नियोजन आहे. प्रवाशांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित व्हावा, यासाठी सेफ्टी ऑडिटबाबत कडक सूचना दिल्या आहेत. पिंपरी-चिंचवडच्या शाश्वत विकासासाठी आणि सुलभ वाहतुकीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> - अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.

# समाविष्ट 32 गावे दोन वर्षांत होणार 'पाणीदार'; 2 हजार कोटींचा 'मेगा प्लॅन'

## जीबीएस बाधित 12 गावांसाठी 894 कोटींची स्वतंत्र पाणी योजना; केंद्रासह राज्य सरकार देणार प्रत्येकी 500 कोटींचा निधी.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावामध्ये येत्या दोन वर्षात पिण्याचे पाणी देण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी बुधवारी सांगितले. या गावांच्या पाणी योजनेसाठी शासनाकडे दोन हजार कोटींचा आराखडा सादर केला आहे. मिळणाऱ्या निधीतून जीबीएस बाधीत १२ गावांसाठी ८९४ कोटींची पाणी योजना,

शहरातील पूरस्थितीवर कायम स्वरूपी तोडगा काढण्यासाठी ४०० कोटींची पावसाळी कामे तसेच साडेसातशे कोटींच्या निधीतून ७ गावांसाठी सांडपाणी व्यवस्थापन योजना राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. २ हजार कोटींमध्ये जागतिक बँक १ हजार कोटींचा निधी देणार असून केंद्र, राज्य सरकार प्रत्येकी ५०० कोटींचा निधी देणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.




### पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजना

» पुणे शहरात पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पूरस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महापालिकेने ४०० कोटी रुपयांचा आराखडा तयार केला आहे. शहरातील ३६६ ठिकाणी पाणी साचण्याच्या समस्येवर उपाय करण्यासाठी ही कामे जून २०२७ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच नवीन हद्दीतील पूर व्यवस्थापनासाठीही स्वतंत्र कामे केली जाणार आहेत. केंद्र सरकारच्या निधीतून सुरू असलेली ७७ कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

### ३२ गावांना पाणीपुरवठ्याचा आराखडा

» महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांमध्ये पुढील दोन वर्षांत पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. यासाठी शासनाकडे २ हजार कोटी रुपयांचा आराखडा सादर करण्यात आला आहे. जागतिक बँकेकडून १ हजार कोटी, तर केंद्र आणि राज्य सरकारकडून प्रत्येकी ५०० कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. गावांमधील पाणी आणि ड्रेनेजच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी महापालिकेने व्यापक नियोजन सुरू केले आहे.

### जीबीएस बाधित गावांसाठी विशेष योजना

» जीबीएस बाधित १२ गावांसाठी ८९४ कोटी रुपयांची स्वतंत्र पाणीपुरवठा योजना तयार करण्यात आली असून, ती जागतिक बँकेकडे सादर करण्यात आली आहे. उर्वरित १३ गावांसाठी ११५६ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून, हा निधी ब्ल्यू बॉण्ड, कर्जरोखे आणि महापालिकेच्या एफडीमधून उभारला जाणार आहे. पुढील काही महिन्यांत निधी मंजूर झाल्यास दोन वर्षांत सर्व कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे.

महापालिकेत २०१७ नंतर समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधे पाणी, ड्रेनेज या दोन प्रमुख समस्या आहेत. तेथे या दोन्ही सुविधा नव्हत्या. पालिकेकडून ३२ मधील ७ गावांमध्ये सध्या पाणी पुरवठा योजनांची कामे सुरू आहेत. त्यानंतर जीबीएस बाधित १२ गावांसाठी ८९४ कोटींचा प्रकल्प आराखडा केला असून तो जागतिक बँकेस सादर केला आहे.

उर्वरीत १३ गावांच्या पाणी पुरवठा योजनेसाठी ११५६ कोटींच्या निधीची गरज आहे. हा निधी पाण्यासाठीचे ब्ल्यू बाँड, कर्जरोखे आणि महापालिकेच्या एफडीमधून उभारणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. या सर्व कामांचे आराखडे तयार असून पुढील तीन ते चार महिन्यांत निधीला मान्यता मिळाल्यास दोन वर्षात हे काम पूर्ण होईल.

शहराच्या जुन्या हद्दीत गेल्या काही वर्षात पावसाळ्यात पाणी साचून पूरस्थिती उद्भवते. शहरात ३६६ जागांवर ही स्थिती आहे. त्यामुळे येथे उपाय योजना करण्यासाठी ४०० कोटींचा आराखडा पालिकेने तयार केला आहे. तोही शासनाकडे पाठवला आहे. तो मंजूर झाल्यानंतर जून २०२७ पूर्वी ही कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच जुन्या हद्दीनंतर नवीन हद्दीतील पूर व्यवस्थापनाची कामे केली जाणार आहे. सध्या पूरस्थिती रोखण्यासाठी ७७ ठिकाणी केंद्राच्या निधीतून कामे सुरू असून ती पावसाळयापूर्वी पूर्ण होणार आहेत.

# गणेशखिंड रस्त्यावरील झाडे तोडणार, आयुक्तांनी केला मोठा दावा

## गणेशखिंड रस्त्यावरील वृक्षतोडीच्या प्रस्तावावर स्वतः सुनावणी घेणार असल्याचे संकेत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले.

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशखिंड रस्त्यावरील वृक्ष तोडण्याबाबत परवानगी देण्याचा कोणताही प्रस्ताव अद्याप आलेला नाही. वृक्षतोड केल्याने नुकसान होणार असेल, तर संबंधित प्रस्ताव अमान्यदेखील होऊ शकतो. या रस्त्यावरील झाडे तोडण्याचा प्रस्ताव आल्यास त्यावर स्वत: सुनावणी घेऊन हरकतींचे निवारण करणार आहे,' असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले.



### काय झाले होते पत्रकार परिषदेत...

» 'वृक्ष संरक्षण कायद्यानुसार वारसा वृक्ष कापण्याचे अधिकार महापालिकेला नाहीत. यासाठी राज्य वृक्ष प्राधिकरणाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र, प्रशासनाने अशी कोणतीही परवानगी न घेता गणेशखिंड रस्त्यावरील अत्यंत जुनी झाडे तोडण्याचा प्रयत्न सुरू केला आहे,' असा आरोप माजी खासदार वंदना चव्हाण आणि पर्यावरण प्रेमी नागरिकांनी केला होता. .

गणेशखिंड रस्त्याच्या रुंदीकरणाला अडथळा ठरणारी ५०० हून अधिक झाडे तोडण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. यातील अनेक झाडे ५० वर्षांहून अधिक जुनी असून, याकडे दुर्लक्ष करून ही झाडे तोडण्याचा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालय आणि महापालिकेच्या पथ विभागाकडून तयार करण्यात आल्याचा दावा आहे. या वृक्षतोडीला माजी खासदार वंदना चव्हाण यांच्यासह पर्यावरणासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आक्षेप घेतला आहे.

याबाबत आयुक्त म्हणाले, 'रस्ता रुंदीकरण, मेट्रो प्रकल्प तसेच नदीसुधार योजनेसाठी शहरातील अडीच हजार झाडे बाधित होणार आहेत. गणेशखिंड रस्त्यावरील झाडे तोडण्याबाबत अद्याप कोणताही प्रस्ताव आलेला नाही. नागरिकांच्या तक्रारी असतील, तर त्यांची दखल घेतली जाईल. सुनावणीनंतर वृक्षतोड करण्यासाठी माझी परवानगी लागते. सुनावणी व परवानगी या प्रक्रियेशिवाय वृक्षतोड होत नाही.' 'शहरातील पर्यावरण चांगले राहणे महत्त्वाचे आहे, त्याच पद्धतीने विकासकामेदेखील झाली पाहिजेत. त्यामुळे वृक्षतोडीसंदर्भातील प्रत्येक प्रकरण बारकाईने पाहणार आहे. झाडे तोडण्याची खरेच गरज आहे का, याचा विचार केला जाईल. झाडे वाचविण्याबरोबरच बाधित वृक्षांचे पुनर्रोपण करणे, वृक्षारोपण याला प्राधान्य दिले जाईल,' असेही आयुक्त राम यांनी सांगितले.

# पुणे रेल्वेस्थानकाचा कायापालट; एसटी बसस्थानक जागेवर इमारत उभारण्याची योजना

## 398 कोटींच्या प्रकल्पात हेरिटेज इमारत जतन करत आधुनिक ट्रान्सपोर्ट हब विकसित करण्याचा आराखडा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे रेल्वेस्थानकाचा कायापालट करण्यासाठी मध्य रेल्वे पुणे विभागाने कंबर कसली असून, आता स्थानकाच्या पुनर्विकासाने वेग घेतला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत पुणे रेल्वेस्थानकाची हेरिटेज (वारसा) इमारत जतन करून, पुणे स्टेशन येथील एसटी बसस्थानकाच्या जागेवर रेल्वेची नवी मुख्य इमारत आणि रोड ओव्हर ब्रिज उभारण्याचे नियोजन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

पुणे रेल्वेस्थानकाच्या पुनर्विकासासाठी केंद्र सरकारने 398 कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर केला आहे. विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) राजेश कुमार वर्मा यांच्या मार्गदर्शनात चालू आर्थिक वर्षातच हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. याचाच एक भाग म्हणून मालधक्का परिसरातील जुन्या इमारती पाडण्यात आल्या असून, रेल्वे यार्डचे विस्तारीकरण आणि नवीन प्लॅटफॉर्मचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे.

रेल्वेने या जागेची मागणी केली असली तरी, एसटी प्रशासन आपली मोक्याची जागा रेल्वेच्या हवाली करणार का? आणि त्या बदल्यात एसटीला पर्यायी जागा किंवा मोबदला काय मिळणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. ही जागा मिळाल्यास पुणे रेल्वेस्थानक हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ट्रान्सपोर्ट हब म्हणून विकसित होण्याचा मार्ग मोकळा होईल, मात्र असे असले तरी एसटी प्रवाशांना रेल्वेस्थानकावर जाण्यासाठी आणि रेल्वेस्थानकावरून एसटी बस स्थानकात जाण्यासाठी मोठा फेरा पडणार आहे. त्यामुळे याबाबत दोन्ही प्रशासनाने योग्य चर्चा करून आणि प्रवासी प्रतिनिधींची मते जाणून अंतिम निर्णय घ्यावा, अशी मागणी प्रवासी तज्ज्ञांकडून केली जात आहे.




### एसटीला दुसरी जागा अन् नवीन बसस्थानकाचा पुनर्विकास

» 'पुणे स्टेशन येथील बसस्थानकाची जागा रेल्वेला मिळाल्यावर त्या जागेच्या बदल्यात रेल्वे प्रशासन एसटीला मालधक्का परिसरात नवीन जागा देणार आहे. याशिवाय नव्याने दिलेल्या जागेत एसटी बसस्थानकाच्या प्रशासकीय इमारती, बस संचलन इमारती आणि अन्य सोयीसुविधा रेल्वे उभारून देणार आहे, अशी माहिती रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली.

### एसटी बसस्थानकाच्या जागेची मागणी

» रेल्वेस्थानकाची मूळ इमारत ही ऐतिहासिक वारसा असल्याने तिला कोणताही धक्का लावता येणार नाही. मात्र, प्रवाशांच्या वाढत्या संख्येसाठी आणि आधुनिक सुविधांसाठी मुख्य इमारत उभारण्यास रेल्वेला जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे पुणे स्टेशन समोरील एसटी बसस्थानकाची मोक्याची जागा रेल्वेला हस्तांतरित करण्याबाबत वरिष्ठ पातळीवर हालचाली सुरू आहेत. या जागेवर पुणे रेल्वेस्थानकाची नवी प्रशासकीय इमारत आणि प्रस्तावित उड्डाणपुलाचा (आरओबी) काही भाग येणार आहे.

> पुणे रेल्वेस्थानकाच्या पुनरविकासाचे नियोजन करताना जुन्या हेरिटेज इमारतीचे अस्तित्व जपण्यास आमचे प्राधान्य आहे. वारसा वास्तूला धक्का न लावता आधुनिक सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी आम्हाला जागेची आवश्यकता आहे. त्यासाठी एसटी प्रशासनाशी जागा हस्तांतरणाबाबत चर्चा सुरू आहे. ही जागा मिळाल्यास तिथे पुणे रेल्वेस्थानकाची नवीन मुख्य इमारत आणि रोड ओव्हर बिजचे काम करता येईल, त्यामुळे प्रवाशांची मोठी सोय होईल.
>
> - हेमंत कुमार बेहेरा, जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे, पुणे विभाग.

# नवले पुलावर आंदोलनांना आता बंदी, आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडून गंभीर दखल

## नवले पूल परिसरात कोणत्याही प्रकारची आंदोलने, निदर्शने, रास्ता रोको किंवा वाहतूक खोळंबविणाऱ्या कृतींना बंदी घालण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

नसरापूर अत्याचार घटनेच्या निषेधार्थ करण्यात आलेल्या रास्ता रोको आंदोलनामुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीची गंभीर दखल घेत पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी घेतली आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेत नवले पूल परिसरात कोणत्याही प्रकारची आंदोलने, निदर्शने, रास्ता रोको किंवा वाहतूक खोळंबविणाऱ्या कृतींना बंदी घालण्यात आली आहे.

पोलीस आयुक्तांनी जारी केलेल्या आदेशानुसार, मुंबई-बेंगळुरू बाह्यवळण मार्गावरील हा परिसर अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा वाहतूक दुवा असल्याने येथे कोणत्याही प्रकारच्या आंदोलनाला परवानगी दिली जाणार नाही. या मार्गावर दररोज हजारो वाहनांची ये-जा होत असते. पुणे शहराकडे येणारी आणि शहराबाहेर जाणारी वाहने, मालवाहतूक, सार्वजनिक वाहतूक सेवा आणि आपत्कालीन सेवा याच मार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. त्यामुळे या परिसरातील वाहतुकीत व्यत्यय आल्यास त्याचा परिणाम केवळ स्थानिक भागापुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण शहराच्या वाहतूक व्यवस्थेवर त्याचे गंभीर पडसाद उमटतात.

या निर्णयाचे सर्वसामान्य नागरिकांकडून स्वागत होत आहे. वाहतूक कोंडीमुळे होणारा मनस्ताप, वेळेची नासाडी आणि अत्यावश्यक सेवांवर होणारा परिणाम लक्षात घेता अशा प्रकारचे निर्बंध गरजेचे असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. दुसरीकडे, काही सामाजिक संघटनांनी आंदोलनाचा घटनात्मक अधिकार कायम ठेवत पर्यायी ठिकाणी आंदोलनासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. आंदोलनामुळे सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत होणे, आपत्कालीन सेवांना अडथळा निर्माण होणे किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे स्वीकारार्ह नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आंदोलनाच्या नावाखाली मुख्य रस्ते रोखणे किंवा सार्वजनिक वाहतुकीत अडथळा आणणे यावर यापुढे कठोर कारवाई केली जाणार आहे.



### महामार्ग रोखल्यास होणार कठोर कारवाई

» पोलीस प्रशासनाने नवले पूल परिसरात विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश दिले असून, या भागात सुरक्षा आणि वाहतूक नियंत्रणासाठी अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. कुठल्याही प्रकारे जमाव जमवून वाहतूक अडविण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार गुन्हे दाखल करणे, प्रतिबंधात्मक कारवाई करणे आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तातडीने पोलिसांची मदत घेणे, अशा उपाययोजनाही राबविण्यात येणार आहेत.